**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.१९/०९/२०२६

***वसई विरारमध्ये पाच दिवसीय गणपतींचे भावपूर्ण विसर्जन***
***महानगरपालिकेच्या कृत्रिम तलावांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद***

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात शुक्रवार दि.१८ सप्टेंबर २०२६ रोजी पाच दिवसांच्या गणपतींचे विसर्जन मोठ्या जल्लोषात व भावपूर्ण वातावरणात पार पडले. पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करणेच्या महानगरपालिकेच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत नागरिकांनी गणेशमूर्ती विसर्जनासाठी महानगरपालिकेने तयार केलेल्या कृत्रिम तलावांना यावर्षीही उत्तम प्रतिसाद दिला आहे. यावर्षी पाच दिवसांच्या एकूण ८०६८ गणेशमूर्तींचे विसर्जन झाले. यामध्ये ७१८९ गणेशमूर्तींचे विसर्जन हे महानगरपालिकेच्या कृत्रिम तलावात करण्यात आले, तसेच ८७९ गणेशमूर्तींचे विसर्जन हे महानगरपालिकेने सोय केलेल्या जेटी, फिरते हौद व बंद दगडखाणीच्या ठिकाणी करण्यात आले. महापालिकेने पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी केलेली जनजागृती, ठिकठिकाणी उभारलेले कृत्रिम तलाव, विसर्जनासाठी केलेल्या सोयी सुविधा यामुळे गणेश भक्तांनी मोठ्या उत्साहात आपल्या गणरायाचे विसर्जन कृत्रिम तलावात करीत पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करणेत सहकार्य केले.
वसई विरार महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची संकल्पना यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी पालिकेने केलेल्या जनजागृतीचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. मा.महापौर श्री.अजीव पाटील व मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी.पी. (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात सर्व ठिकाणी उत्तम विसर्जन व्यवस्था करण्यात आली आहे. शुक्रवारी वसई विरार शहरात एकूण ८०६८ पाच दिवसीय गणेशमूर्तींचे विसर्जन झाले. यामध्ये घरगुती ७५२३ व सार्वजनिक ५४५ गणेशमूर्ती होत्या.
शहरातील पाच दिवसांच्या गणपती विसर्जनाकरिता, प्रत्येक कृत्रिम तलाव विसर्जनस्थळी नागरिकांच्या सोयीसाठी मंडप व्यवस्था, आरती स्थळे, दिवाबत्ती सोय, मूर्ती संकलन केंद्र, निर्माल्य कलश, वैद्यकीय मदत कक्ष, सीसीटीव्ही कॅमेरे इ.आवश्यक सर्व उपाययोजना महानगरपालिकेमार्फत करण्यात आल्या होत्या.
नागरिकांना त्यांच्या जवळील गणेशमूर्ती विसर्जन स्थळाची माहिती तसेच तेथे जाण्याचा मार्ग सहज व त्वरित उपलब्ध व्हावा, यासाठी महानगरपालिकेमार्फत प्रत्येक विसर्जन स्थळाचा QR कोडद्वारे ऑनलाइन Google Location उपलब्ध करून देण्यात आला आहे.
पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करणेसाठी व मा.न्यायालयाच्या व शासनाच्या सूचनांचे पालन करून येणाऱ्या यापुढील दिवशी होणाऱ्या विसर्जनावेळी नागरिकांनी मूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलावांना प्राधान्य द्यावे आणि निसर्गाची हानी टाळावी असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.